# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657 E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, शनिवार, दिनांक ३ जानेवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३११ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये


## संपादकीय

## बंडखोरांची हवा

कधी नव्हे ते यंदाच्या महापालिका निवडणुकीत बंडखोरांची प्रामुख्याने चर्चा आहे. सर्वच पक्षात बंडखोरी झाली आहे. या बंडखोरांची समजूत काढता काढता सर्वच पक्षाच्या नेत्यांची दमछाक झाली आहे. कुणाला आणि कसे समजवावे असा प्रश्न नेत्यांसमोर ठाकला होता. अनेक वर्षांपासून पक्षात कार्यरत असलेल्या बंडखोर उमेदवारांना काय आश्वासन द्यायचे असाही प्रश्न या नेत्यांना पडला होता. उमेदवारी मागे घेऊ नये यासाठी शुक्रवारी नागपुरात हायहोल्टेज ड्रामा पहायला मिळाला. उमेदवारही मोठे हुशार. त्यांनी अर्ज तर भरला. अर्ज मागे घेण्याच्या वरिष्ठ नेते आपली मनधरणी करतील हे लक्षात घेऊन ते नॉट रिचेबल झाले. सकाळपासूनच सर्वच पक्षातील नेते या बंडखोर उमेदवारांशी संपर्क असताना संपर्क होत नव्हता. त्यामुळे नेत्यांसमोर पेच निर्माण झाला. अर्ज मागे घेण्याची वेळ संपल्यानंतर हे उमेदवार रिचेबल झाले. नेत्यांनी त्यांच्याशी संपर्क केला असता आम्ही देवदर्शनासाठी आलो असल्याने फोन लागत नव्हता असे उत्तर या उमेदवारांकडून मिळत होते. अनेक ठिकाणी बंडखोरांसोबत संपर्क न झाल्याने त्यांची उमेदवारी कायम आहे. त्याचा फटका पक्षातील अधिकृत उमेदवारांना बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अधिकृत उमेदवारांची देखील धाकधुक वाढली आहे. बंडखोर निवडणुकीच्या रिंगणात असल्याने आता शेवटचा पर्याय म्हणून आम्हाला पाठिंबा द्या अशी म्हणण्याची वेळ अधिकृत उमेदवारांवर आली आहे. त्यासाठी चिरीमिरी द्यायला सुद्धा हे उमेदवार मागेपुढे पाहणार नाही. बंडखोरी केल्यामुळे पक्षाच्या वतीने आपल्यावर कारवाई होणार हे या बंडखोरांना चांगल्याप्रकारे माहित आहे. पुढच्या पुढे आताचा विचार करा असे बंडखोरांना वाटत आहे. आलेल्या संधीच सोन करा आणि गंगेत हात धुऊन घ्या असेही काही बंडखोरांनी मनाशी ठरविले आहे. खरे चित्र मतमोजणी झाल्यावरच स्पष्ट होणार आहे. मात्र, तोपर्यंत बंडखोरांची चर्चा सर्वांच्या तोंडी राहणार आहे.

## चोखाळा येथे स्वच्छता अभियान

रामटेक, दि. २

वर्षाचा शेवटचा दिवस स्वच्छता अभियान आणि नवीन वर्षाची सुरुवात भगवंताच्या चरणी नमन करून चोखाळ गावातील परमपूज्य परमात्मा एक वार्षिक संमेलन उत्सव आहे. वर्षानुवर्षे चालत आलेल्या या उत्सवाचा परंपरेचा आनंदमय वातावरणात भव्य दिव्य परमात्मा एक सोहळा चोखाळा येथे पार पडत आहे. या नवीन वर्षाच्या उत्सवानिमित्त भव्य परमात्मा एक रॅली चे आयोजन असते. त्या एक दिवसाआधी म्हणजे वर्षाच्या शेवटच्या दिवशी ग्राम स्वच्छता अभियान मोहीम राबवली जाते. ''जो स्वच्छतेची वाट धरी, आरोग्य नांदेल त्यांच्या घरी'' या पद्धतीने प्रण घेऊन आपण स्वच्छतेच्या निर्धार करावा स्वच्छता ही एक मोहीम व चळवळ आहे असे समजून स्वच्छते विषयी कार्य करावे म्हणून गावातील सर्व सेवक सेविका एकत्र येऊन स्वच्छता अभियान रॅली काढतात आणि संपूर्ण गाव पाणी मारून झाडू करून स्वच्छ करतात यावेळी उपस्थित-दिव्यनारी सोशल फाउंडेशन अध्यक्षा कामिनी हटवार, तंटामुक्ती अध्यक्ष माधवराव हटवार, विनोद हटवार, शंकरजी मेहर, अरुण मेश्राम, उषाताई कीरपान, यमुना हटवार सर्व परमात्मा एक सेवक मंडळ उपस्थित होते.

## उमेदवारी मागे न घेण्यासाठी

# भाजपच्या उमेदवाराला घरातच कोंडले

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी

नागपूर, दि. २

उमेदवारी अर्ज मागे घेऊ नये यासाठी भाजप उमेदवाराच्या समर्थकांनी या उमेदवाराला घरात कोंडून बाहेर कुलूप लावून घेतले. दोन तास चाललेल्या या हायहोल्टेज ड्रामामुळे संपूर्ण राज्यात राजकीय क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

भाजपाने प्रभाग १३ मधून माजी नगरसेवक सतीश होले आणि किसन गावंडे यांना उमेदवारी दिली होती. दोघांनाही एबी फॉर्म देण्यात आला होता. गावंडे यांना उमेदवारी मिळाल्याने त्यांच्या समर्थकांमध्ये आनंदाची लाट पसरली होती. त्याचप्रमाणे समर्थकांनी प्रचाराला देखील सुरूवात केली होती. दरम्यान, आज शुक्रवारी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा दिवस होता. सकाळीच शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी गावंडे यांच्याशी संपर्क साधून उमेदवारी अर्ज मागे घेण्यास सांगितले. त्यामुळे गावंडे पेचात पडले. त्यांनी अर्ज मागे घेण्याची तयारी देखील केली होती. ही माहिती त्यांच्या समर्थकांना समजताच हजारी पहाड येथील कार्यकर्ते गावंडे यांच्या घरी आले. कार्यकर्त्यांनी गावंडे यांच्या मुख्य दाराला बाहेरून कुलूप लावून गावंडेसह त्यांच्या कुटुंबियांना घरात कोंडले. जोपर्यंत तीन वाजत नाही तोपर्यंत गावंडे यांना बाहेर येऊ देणार नाही असा पवित्रा कार्यकर्त्यांनी घेतला. कार्यकर्त्यांमध्ये महिलांचा प्रामुख्याने सहभाग होता.

ही माहिती भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांना समजताच एकच खळबळ उडाली. दुपारी १२ च्या सुमारास आमदार परिणय फुके गावंडे यांच्या घरी आले. फुके यांनी कार्यकर्त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. परंतु, कार्यकर्ते आपल्याच मागणीवर अडून होते. गावंडे यांना बाहेर येऊ देणार नाही असे कार्यकर्ते म्हणत होते. शेवटी कार्यकर्त्यांना समजाविण्यात फुके यांना यश आले आणि कार्यकर्त्यांनीच दाराचे कुलूप उघडून गावंडे यांना बाहेर काढले. त्यानंतर गावंडे यांना घेऊन फुके अर्ज मागे घेण्यासाठी धरमपेठ कार्यालयात गेले. अर्ज मागे घेतल्यानंतर ते मुख्यमंत्र्यांच्या भेटीला निघून गेले. या घटनेमुळे राज्यात एकच खळबळ उडाली असून दिवसभर या प्रकाराची चर्चा सुरू होती.



### गावंडेच हवे : कार्यकर्ते

याप्रकरणी कार्यकर्त्यांशी संवाद साधला असता ते म्हणाले की, माजी नगरसेवक होले हे काहीच कामाचे नाहीत. प्रभागात ढुंकुनही पाहत नाही. हे आम्ही मागील दहा वर्षांत पाहिले. आम्हाला ज्या अडचणी येतात त्या कुणाला सांगाव्यात असाही प्रश्न या कार्यकर्त्यांनी उपस्थित केला. गावंडे हे नगरसेवक नसले, तरी रात्री बेरात्री लोकांच्या मदतीला धाऊन जातात. अशा नगरसेवकाची खरी गरज आहे. त्यामुळे नगरसेवक म्हणून आम्हाला गांवडे हेच हवेत असेही कार्यकर्ते म्हणाले.

### पक्षाचा आदेश सर्वोतोपरी : गावंडे

या प्रकारावर किसन गावंडे यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले की, कार्यकर्ते प्रेम करतात. त्या प्रेमापोटीच त्यांनी हा प्रकार केला. सामान्य कार्यकर्ता म्हणून मी भाजपात प्रवेश केला. माझ्या कामाची प्रगती पाहता पक्षाच्या नेत्यांनी मला महत्वाच्या पदावर काम करण्याची संधी दिली आणि सिद्ध करून दाखविले. त्यामुळेच यंदा पक्षाने मला उमेदवारी दिली. शेवटी पक्षाचा आदेश हा सर्वोतोपरी आहे. त्यामुळे मी माझा अर्ज मागे घेतला असल्याचे गावंडे यांनी सांगितले.

## नार्वेकरांवर आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल करा : सपकाळ



युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी

मुंबई, दि. २

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विरोधी पक्षांच्या उमेदवारांना अर्ज दाखल करताना धमकावल्याचा प्रकार अत्यंत गंभीर आहे. नार्वेकर यांचे वर्तन आक्षेपार्ह आणि आदर्श आचारसंहितेचा भंग करणारे असल्याने त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शुक्रवारी राज्य निवडणूक आयोगाकडे पत्र पाठवून केली आहे.

मुंबई महापालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक २२५, २२६ आणि २२७ मधून राहुल नार्वेकर यांचे भाऊ मकरंद नार्वेकर, बहिण गौरवी शिवलकर आणि वहिनी हर्षदा नार्वेकर यांनी भाजपकडून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करताना नार्वेकर स्वतः उपस्थित होते. ३० जानेवारीला संध्याकाळी ५ वाजण्याच्या सुमारास अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असताना त्यांनी विरोधी पक्षाच्या उमेदवारांच्या अर्ज दाखल करण्यापासून रोखल्याचा आरोप होत आहे. शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी नार्वेकर यांचा एक वादग्रस्त व्हिडीओ शुक्रवारी एक्स या समाज माध्यमात व्हायरल केला. या पार्श्वभूमीवर काँग्रेसनेही नार्वेकर यांच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. विधानसभा अध्यक्षांच्या कार्यालयातील तब्बल ७० अधिकारी आणि कर्मचारी नार्वेकर यांचे नातेवाईक असलेल्या उमेदवारांच्या निवडणूक प्रचारात सक्रीय भाग घेत आहेत. या सर्वांवरही आचारसंहिता भंगाचे गुन्हे दाखल करून कारवाई करावी, अशी मागणी सपकाळ यांनी राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांना पाठवलेल्या पत्रात केली आहे.

लोकशाहीत निवडणुका निष्पक्ष, पारदर्शक आणि निर्भिड वातावरणात पार पाडणे हे आयोगाचे कर्तव्यच आहे. परंतु या निवडणुकांमध्ये विरोधी पक्षांच्या उमेदवारांवर दबाव आणून अर्ज मागे घेण्यास भाग पाडले जात असल्याच्या तक्रारी येत आहेत. महत्वाचे म्हणजे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विरोधी पक्षांच्या उमेदवारांचे अर्ज दाखल करुन घेऊ नये यासाठी प्रशासनावर दबाव आणला. त्यांनी विरोधी पक्षांच्या उमेदवारांना धमकावले हे अत्यंत गंभीर आहे.

# मराठी साहित्य संमेलनाचे फडणवीस यांच्या हस्ते उदघाटन

अजित जगताप

सातारा, दि. २ : राज्यात शालेय शिक्षणात मराठी हीच अनिवार्य भाषा राहील. इतर कोणतीही भारतीय भाषा अनिवार्य नसेल, ती ऐच्छिक स्वरूपात राहील. इतर भाषा कोणत्या इयत्तेपासून सुरू करायच्या याबाबतचा निर्णय डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर घेतला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती महाराष्ट्राचा आत्मा आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी सातारा येथील शाहू स्टेडियममध्ये आयोजित ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी केले.



यावेळी संमेलनाच्या उद्घाटक ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. मृदुला गर्ग, स्वागताध्यक्ष तथा राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, ९९ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील, ९८ व्या संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. ताराबाई भवाळकर, आमदार अतुल भोसले, मनोज घोरपडे, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, नगराध्यक्ष अमोल मोहिते, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, उद्योजक उद्योजक व संमेलनाचे संरक्षक फरोख कूपर, जिल्हाधिकारी संतोष पाटील आदींसह तसेच साहित्य महामंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

विश्वास पाटील यांची 'पानिपत' कादंबरी वाचताना आपल्या विचारविश्वावर खोल परिणाम झाल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, मराठी मातीशी प्रामाणिक राहून इतिहास, समाज आणि माणूस केंद्रस्थानी ठेवणारे साहित्य निर्माण होणे हीच मराठी साहित्याची खरी ओळख आहे. वारकरी साहित्य, संत ज्ञानेश्वर महाराज, संत नामदेव महाराज यांच्या योगदानाचा गौरव करताना संत तुकाराम महाराजांचे विचार आणि शब्देचि रत्ने ही परंपरा आजही समाजाला दिशा देत असल्याचे त्यांनी नमूद केले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यव्यवहार कोश तयार करून मराठी भाषेला प्रशासकीय दर्जा दिला, याची आठवण करून देत मुख्यमंत्री म्हणाले की, मराठीच्या संवर्धनासाठी शासन कटिबद्ध आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला असून, आता मराठीच्या विकासासाठी केंद्र सरकारच्या सहकार्याने सकारात्मक पावले उचलली जात आहेत. मात्र केवळ दर्जा मिळवणे पुरेसे नसून मराठीला व्यापक लोकमान्यता मिळवून देणे हे आपले ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जेएनयूसारख्या संस्थांमध्ये मराठी अध्यासन सुरू करण्यात आल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

## ट्रकच्या धडकेने महिलेचा मृत्यू

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी

नागपूर, दि. २

घरातील कचरा फेकण्यासाठी घराबाहेर पडलेल्या महिलेला ट्रकची धडक बसल्याने उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

आशा बबन पोफरे (६३) समतानगर, टिमकी असे मृतकाचे नाव आहे.

१ जानेवारी रोजी सकाळी १०.३० च्या सुमारास ही घटना घडली. घटनेच्या वेळी आशा पोफरे या घरातील कचरा फेकण्यासाठी सुलभ शौचायालयाजवळ गेल्या होत्या. त्याचवेळी महापालिकेच्या एमएच ४९ एटी ६२३१ क्रमांकाच्या ट्रकचालकाने त्यांना धडक दिली. गंभीर अवस्थेत त्यांना मेयो रुग्णालयात नेले असता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

## गुंड बाबा खट्या कारागृहात स्थानबद्ध

नागपूर, दि. २

पाचपावली हद्दीतील कुख्यात गुंड राकेश उर्फ बाबा खट्या नरेश झोडापे (३६) बारसेनगर, पाचपावली यास पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंघल यांनी मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध केले.

# मुंबईत ठाकरे-पवारांच्यायुतीला दे धक्का!

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी

मुंबई, दि. २

विधानसभा निवडणुकीनंतर 'मिनी विधानसभा' म्हणून पाहिल्या जाणाऱ्या महापालिका निवडणुका आता निर्णायक टप्प्यावर पोहोचल्या आहेत. आज उमेदवारी अर्ज माघारीचा शेवटचा दिवस असताना, राज्यभरात राजकीय समीकरणं क्षणाक्षणाला बदलत आहेत. अनेक ठिकाणी अपक्षांनी माघार घेत पक्षीय उमेदवारांचा रस्ता मोकळा केला असतानाच, मुंबईत मात्र ठाकरेपवारांच्या युतीला बसलेला अनपेक्षित धक्का चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे.

मुंबई महापालिकेच्या २२७ जागांसाठी शिवसेना (ठाकरे गट) मनसे आणि यांची युती झाली आहे. मात्र, याच युतीतील राष्ट्रवादीच्या



एका उमेदवाराने परस्परपणे उमेदवारी अर्ज माघारी घेतल्याने राजकीय खळबळ उडाली आहे.

प्रभाग क्रमांक २११ मधून राष्ट्रवादीचे उमेदवार सुफियान अन्सारी यांनी कोणतीही पूर्वकल्पना न देता माघार घेतली. ना वरिष्ठ नेत्यांना कल्पना, ना समन्वय समितीला माहिती! त्यामुळे राष्ट्रवादीत तीव्र नाराजी उफाळून आली आहे.

या अचानक झालेल्या निर्णयामुळे यांच्या पक्षाला मुंबईत दुसरा मोठा धक्का बसला आहे.

प्रभाग २११ मध्ये आता चित्र पूर्णपणे बदलले आहे. येथे आमदार रईस शेख यांचे स्वीय सहाय्यक वकार खान काँग्रेसचे उमेदवार आहेत.

## वाहनचोरास अटक

नागपूर, दि. २

बाजारातून दुचाकी चोरून नेणाऱ्या साहील राधेश्याम काळभूत (१९) रा. हिरणवार ले आऊट यास युनिट १ च्या पथकाने अटक केली.

२८ डिसेंबर रोजी दाते ले आऊट, प्रतापनगर येथील धुपलाल मंडलेकर (३०) हे जयताळा येथील बाजारात गेले होते. त्यांनी आपली दुचाकी बाजाराच्या वॉल कंपाऊंडजवळ कुलूपबंद करून ठेवली होती. धुपलाल बाजार खरेदीत व्यस्त असताना साहीलने त्यांची दुचाकी चोरून नेली. याप्रकरणी प्रतापनगर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. युनिट १ च्या पथकाने बजाजनगर येथून साहील यास दुचाकीसह ताब्यात घेतले. त्याची विचारपूस केली असता दुचाकी चोरीची असल्याची त्याने कबुली दिली.

# मनपा निवडणुकीतून ३०२ उमेदवारांची माघार

नागपूर, दि. २

नागपूर महापालिका निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी शुक्रवारी भाजप व काँग्रेस बंडखोरांस एकूण ३०२ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले आहे. आता निवडणुकीच्या लढतीचे चित्र स्पष्ट झाले आहे.

उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या पहिल्या दिवशी गुरुवारी केवळ १२ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले होते. मात्र, आज शेवटच्या दिवशी तब्बल २९० उमेदवारांनी माघार घेतल्याने निवडणूक रिंगणातील चित्र स्पष्ट झाले आहे. उमेदवारी न मिळाल्याने नाराज भाजपच्या अनेक माजी नगरसेवकांनी उमेदवारी दाखल केली होती. यात काही काँग्रेसच्या माजी नगरसेवकांचाही समावेश होता. परंतु भाजपचे काही नाराज अजूनही मैदानात असल्याने लढतीतील रंगत वाढली आहे. नागपुरात अतीतटीची निवड होणार असून कुणीही बिनविरोध निवडून आले नाही. त्यामुळे सर्वच प्रभागात लढती रंगतदार असणार आहेत.





झोननिहाय आकडेवारी पाहता लकडगंज झोनमध्ये सर्वाधिक ४३ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले. त्यानंतर मंगळवारी झोनमध्ये ३७, सतरंजीपुरा झोनमध्ये ३५, तर धंतोली आणि नेहरूनगर झोनमध्ये प्रत्येकी ३३ उमेदवारांनी माघार घेतली आहे. गांधीबाग महाल झोनमध्ये ३०, हनुमानगर झोनमध्ये २८, आसीनगर झोनमध्ये २७, धरमपेठ झोनमध्ये २४, तर लक्ष्मीनगर झोनमध्ये १२ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत. या माघारीमुळे अनेक प्रभागांतील उमेदवारांची संख्या लक्षणीयरीत्या कमी झाली आहे.

### राष्ट्रवादीचा 'मास्टरस्ट्रोक'!

## डॉक्टर, इंजिनिअर्ससह उत्तर भारतीयांना संधी : मलिक

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी

मुंबई, दि. २



मुंबई महापालिकेच्या रणांगणात राजकीय तापमान कमालीचं वाढलं असताना, ने असा डाव टाकला आहे की, सगळ्यांचे गणिते पुन्हा एकदा मांडली जात आहेत. डॉक्टर, इंजिनिअर, वकील, प्रोफेशनल्स, महिला आणि उत्तर भारतीयांचा ठोस वाटाया उमेदवारी यादीसह राष्ट्रवादीने मुंबईत 'मास्टरस्ट्रोक' केल्याचा दावा स्वतः पक्षाचे ज्येष्ठ नेते यांनी पत्रकार परिषदेत केला. ज्या प्रभागांमध्ये राष्ट्रवादी ताकदीने लढू शकते, तिथेच आम्ही उमेदवार दिले आहेत, असं ठाम सांगत नवाब मलिक यांनी मुंबईत राष्ट्रवादीच्या विजयाचा विश्वास व्यक्त केला. यादीचं वैशिष्ट्य सांगताना त्यांनी स्पष्ट केलं डॉक्टर, इंजिनिअर्स, वकील, प्रोफेशनल्स यांना संधी, महिला उमेदवारांचा वाढता वाटा, मराठी भूमिपुत्रांसह उत्तर भारतीयांना सर्वाधिक प्रतिनिधित्वहीच आमची 'समावेशक' भूमिका. ''काही पक्ष उत्तर भारतीयांना फक्त मतपेढी समजतात; आम्ही मात्र समान संधी देतो,'' असा स्पष्ट संदेश मलिकांनी दिला. निवडणूक जाहीर होताच नवाब मलिकांच्या नावावरून महायुतीत निर्माण झालेल्या ओढाताणीवर मलिकांनी थेट भाष्य केलं. ''माझ्या नावाने 'बोंबाबोंब' झाली. 'मलिक असतील तर युती तोडू' अशा धमक्या दिल्या गेल्या,'' असं सांगत त्यांनी आभार मानले ''अजित पवारांनी कोणाच्याही दडपणाला न झुकता मुंबईत स्वबळावर लढण्याचा स्वाभिमानी निर्णय घेतलातो योग्य आहे,'' असे मलिक ठामपणे म्हणाले.

भाजपकडून आपल्या नावाला विरोध झाल्याचा उल्लेख करत मलिकांनी वर जोरदार हल्लाबोल केला.

# यवतमाळ जिल्ह्यातील गुन्हेगारी नियंत्रीत

### पोलिस अधिक्षक कुमार चिंता यांची माहिती : गांजासह एमडीवर मिळविले नियंत्रण, ऑपरेशन प्रस्थानचीही प्रभावी कामगिरी

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी,

यवतमाळ, २ जानेवारी

गेल्या वर्षभरातील पोलिसिंग, गुन्हेगारांवर करण्यात आलेली कारवाई तसेच गुन्हे दाखल झाल्यानंतर करण्यात आलेल्या तपासामुळे जिल्ह्यातील गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्यात आले असून गुन्हेगारीचे प्रमाण घटल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी दिली.

सन २०२४ मध्ये सर्व प्रकारच्या गुन्ह्यांचे प्रलबिंत प्रमाण २३ टक्के होते. या वर्षात ते सात टक्क्यावर आहे. शारीरिक गुन्ह्यातही २० टक्के घट झाली आहे. ऑपरेशन प्रस्थानच्या माध्यमातून महिलांकरीता राबविण्यात आलेल्या उपक्रमामुळे बलात्कार, विनयभंगासारख्या गुन्ह्यात घट झाल्याचेही चिंता यांनी सांगितले. अंमली पदार्थ तस्करीचे प्रमाण वाढले होते. यावर लक्ष केंद्रित करून ५२ आरोपीविरुद्ध कारवाई करण्यात आली. ३४ गुन्ह्यात गांजा व एमडीचे ४८ लाख ३१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अवैध २५ अग्नीशस्त्र तसेच ३८४ काडतूस जप्त करण्यात आले असून १४७ जणांवर कारवाई करून १३७ गुन्हे दाखल करण्यात आले.



अवैध गुटखा प्रकरणात एक कोटी १९ लाख ३२ हजार ४९४, तर अवैध वाळू प्रकरणात तीन कोटी १३ लाख ८४ हजार ३३७ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जिल्ह्यात संघटित गुन्हे करणाऱ्या चार टोळ्यामधील २५ आरोपींवर कारवाई करण्यात आली. एमपीडीएचे २७ प्रस्ताव तयार करण्यात आले. मकोका अंतर्गत ४६ जणांना हद्दपार करण्यात आले.

मोक्कातंर्गत ३१ आरोपीविरुद्ध प्रभारी प्रतिबंधक कारवाई करण्यात आली. हरविलेल्या व्यक्तींचा शोध घेण्यासाठी ऑपरेशन शोध मोहिम राबवून तीन हजार महिला, दोन हजार ३०० पुरुषांचा शोध घेण्यात आल्याची माहिती कुमार चिंता यांनी दिली. पत्रकार परिषदेस स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चावरे, सहाय्यक पोलिस निरीक्षक मनीष गावंडे उपस्थित होते.

## शहराची भयमुक्तिकडे वाटचाल

### आ. बाळासाहेब मांगूळकर यांनी दिलेले आश्वासन केले पुर्ण

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी,

यवतमाळ, २ जानेवारी

विधानसभा निवडणूकीत जनतेला दिलेल्या जाहीरनाम्यात दिलेला प्रत्येक शब्द निवडूण आल्यानंतर प्रत्येक जण पुर्ण करतोच असे नाही. मात्र बाळासाहेब आमदार झाल्यानंतरही शब्द जपतात, याची प्रचिती त्यांनी अनेकदा दिली आहे. पुन्हा एकदा 'यवतमाळ भयमक्त करु' असा दिलेला शब्द त्यांनी खरा करून दाखविला आहे. आमदार होताच त्यांनी सर्वप्रथम पावसाळी अधिवेशनात शहरातील वाढती गुन्हेगारी कमी करण्याची मागणी लावून धरली होती. त्याचे फलीत झाल्याचे पोलिस विभागाने दिलेल्या आकडेवारीवरुन लक्षात येते.



शहर आणि विधान सभा क्षेत्रात वर्षभरात पोलीस विभागाच्या सतर्कतेने जन जीवनाच्या दृष्टीने सुरक्षित होऊ लागले आहे, यवतमाळ शहर भय मुक्त होऊ लागले आहे! निवडणुकीत जनता जनार्धनाला हे शहर भयमुक्त करून दाखवील व त्यासाठी प्रसंगी विधिमंडळात पाठ पुरावा करील असे म्हटले होते! मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेतील माझे निवेदन लक्षात घेत ,जिल्हा पोलीस विभागाच्या वरीष्ठांना तात्काळ सूचना केल्यात,आणि पोलीस विभागाने कडक पाऊले उचलली! त्यामुळे यवतमाळ शहर व मतदार संघात आता भयमुक्त वातावरण दिसत आहे!

## यवतमाळ येथील रामद्वारामध्ये सत्संगाचे आयोजन 4 जानेवारी पासुन

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ, प्रतिनिधी, दि.२ जानेवारी

अखिल भारतीय रामस्नेही संप्रदायाच्या रेण पीठ (राजस्थान) येथील पीठाधीश्वर श्री 1008 आचार्य श्री सजनरामजी



महाराज यांच्या पावन सान्निध्यात यवतमाळ शहरात सत्संगाचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षीच्या परंपरेनुसार यावर्षीदेखील हा सत्संग यवतमाळ येथील अग्रसेन भवनासमोर असलेल्या 'रामद्वारा' येथे संपन्न होणार आहे. हा सत्संग दि. 4 जानेवारी ते 6 जानेवारी 2026 या कालावधीत दररोज दुपारी 3 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत आयोजित करण्यात येणार आहे. या काळात आचार्य श्री सजनरामजी महाराज आपल्या तेजस्वी, मधुर व ओजस्वी वाणीतून भक्तांना सत्संग व आध्यात्मिक प्रबोधन करणार आहेत. या पावन प्रसंगी अधिकाधिक भक्तांनी उपस्थित राहून सत्संगाचा आध्यात्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

युवाराष्ट्र दर्शन

-: कार्यालयीन पत्ता :-
गुरुमाऊली सोसायटी, दाते कॉलेज रोड, जुना उमरसरा, यवतमाळ ४४५००१

-: जिल्हा प्रतिनिधी :-
संजय सावरकर मो. ९४२१८४४८७०

* एजन्सीसाठी संपर्क

ई-मेल ssawarkar43@gmail.com

## संक्षिप्त

### कड्याने मारहाण

•युवाराष्ट्र दर्शन बाभुळगाव

पोलीस स्टेशन अंतर्गत राणी अमरावती येथे वैशाली नारायण विधाते यांनी मारहाणीची तक्रार दिली आहे. आरोपी सुरज मोहन पाचभाई आणि गुड्डू ऊर्फ महेश पाचभाई यांनी संगणमत करून फिर्यादीच्या भावास मारहाण केली. आरोपीच्या वडिलांसोबत झालेल्या जुन्या वादाचा राग धरून आरोपींनी फिर्यादीचा भाऊ भगवान विधाते याच्या तोंडावर लोखंडी कड्याने वार करून त्याला जखमी केले. ही घटना ३१ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ९:३० वाजता सागर जयस्वाल यांच्या दुकानासमोर घडली. पोलिसांनी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे.

### दुचाकीची चोरी

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ

वडगाव जंगल पोलीस स्टेशन हद्दीतील आकपुरी ग्राम येथून एक दुचाकी चोरीला गेल्याची घटना घडली आहे. फिर्यादी आकाश मोहन जाधव यांची जुनी वापरती काळ्या रंगाची हिरो स्प्लेंडर प्लस (क्र. MH 29 AH 9376) अज्ञात चोरट्याने पळवून नेली. ही चोरी २८ डिसेंबरच्या रात्री ते २९ डिसेंबर २०२५ च्या पहाटे दरम्यान फिर्यादीच्या घरावरून झाली. चोरीला गेलेल्या या दुचाकीची अंदाजे किंमत १२,००० रुपये आहे. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भा.न्या.सं. कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

### अवैध रेती जप्त

•युवाराष्ट्र दर्शन घाटंजी

घाटंजी तालुक्यातील पार्डी नस्करी शिवारात महसूल विभागाने मोठी कारवाई करत अवैध रेती तस्करी पकडली आहे. आरोपी विठ्ठल मेथ्या राठोड आणि शिशुपाल पवार यांच्यासह पाच जण दोन ट्रॅक्टरद्वारे विनापरवाना रेतीची वाहतूक करत असताना मिळून आले. या कारवाईत १४,००० रुपयांची २ ब्रास रेती आणि स्वराज, सोनालिका व युरो कंपनीचे तीन ट्रॅक्टर असा एकूण १७,१४,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. महसूल अधिकारी प्रकाश कार यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### आठ बकऱ्यांची चोरी

•युवाराष्ट्र दर्शन घाटंजी

पारवा पोलीस स्टेशन अंतर्गत मौजा झटाळा येथे पशुधनाच्या चोरीची घटना उघडकीस आली आहे. फिर्यादी मारोती खेतु धुर्वे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १ जानेवारी २०२६ च्या पहाटे अज्ञात चोरट्याने त्यांच्या मालकीचे ४ बोकड आणि ४ बकऱ्या चोरून नेल्या. या एकूण ८ नगांची किंमत अंदाजे २४,००० रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

# ॲड. प्रियदर्शनी अशोक उईके यांनी स्वीकारला नगराध्यक्ष पदाचा पदभार

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २ जानेवारी

यवतमाळ शहराच्या सर्वांगीण विकासासोबतच महिला सुरक्षा युवक रोजगार आणि डिजिटल प्रशासनावर विशेष भर देण्याचा निर्धार नवनिर्वाचित नगरपरिषद अध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके यांनी व्यक्त केला पदभार स्वीकारल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी नगरपरिषदेचा कृती आराखडा जाहीर करून शंभर दिवसात संपूर्ण शहरातील बदल दिसून येईल असे स्पष्ट केले.

आयोजित पत्रकार परिषदेला भाजपाचे जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल चौहान, जिल्हा महामंत्री राजू पडगिलवार, नगरपरिषदेतील भाजप गटनेते नितीन गिरी, आणि



प्रभार स्वीकारतांना माजी मंत्री मदन येरावार हे स्वतः उपस्थित होते त्यांच्यासमोर ॲड. प्रियदर्शनी उईके यांनी प्रभार लेखावर स्वाक्षरी करून प्रभार स्वीकारला प्रभार स्वीकारल्यानंतर सुरुवातीलाच नगर परिषदेच्या विकास कामाला तात्काळ प्रारंभ करण्यासंदर्भात मुख्याधिकारी यांना सुचविण्यात येणार असल्याचे सांगत नगर परिषदेचे संकेतस्थळ पूर्णता अद्यावत करण्यात येणार असून नागरिकांसाठी एआय, चॅट डॉट सेवा सुरू केली जाणार आहे तसेच क्यू आर कोड द्वारे कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. माहिती अधिकार अधिनियम 2005 नुसार सर्व विभागाची माहिती संकेतस्थळावर सार्वजनिक करण्यात येणार असून स्वयंप्रगती करण्यासाठी स्वतंत्र क्युआर कोड प्रणाली विकसित केली जाणार आहे या दृष्टीने नागरिकांसाठी स्क्रीन रीडर सुविधा देण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

शहरातील अतिशय महत्त्वाचा विषय महिलांची सुरक्षितता, हा विषय यापूर्वीच त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माहिती करून दिला होता, तोच विषय त्यांनी पुन्हा नव्याने हाताळला असून या संदर्भात पोलीस विभागाकडून महिला सुरक्षेतेसाठी निर्भया पथकाची शहरात वाढ करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले शाळा, कॉलेज महाविद्यालय, या ठिकाणी निर्भया पथक हजर केल्या जाणार आहे आणि यावर ठोस उपाय योजना राबविल्या जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून युवक युवतींसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण, स्टार्टअप आणि नव संकल्पनांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे, विविध महामंडळाच्या माध्यमातून स्वयंरोजगारांसाठी कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्याची नियोजन आहे शिवाय स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका आणि मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात येणार असून यासाठी नगर परिषदेचे एक विशिष्ट दालन निर्माण करण्यात येईल हे काम लगेच सुरू होईल असे भरीव आश्वासन त्यांनी दिले.

# आर्णी न.प.त राष्ट्रवादी महायुती करण्यास तयार

## अभद्र युती नको : सुनील पोतगंटवार

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, आर्णी, दि. २ जानेवारी



नुकत्याच झालेल्या आर्णी नगरपरिषदेच्या निवडणुकीत महायुतीचे मित्रपक्ष एकमेकां विरुद्ध जरी लढत होते तरी त्यांनी एकमेकां विरोधात चिखलफेक केली नाही अथवा टीका टिप्पणी केली नाही. सोहर्दपूर्ण वातावरणात निवडणूक पार पडली. त्यात शिवसेना (शिंदे गट) चे चार तर राष्ट्रवादी (अजित दादा गट) चे ८ व भारतीय जनता पार्टीचे एक असे एकूण १३ नगरसेवक हे महायुतीचे असून त्यात राष्ट्रवादीची स्पष्ट भूमिका आहे की आर्णी शहराचा विकास करण्याकरिता आपण महायुतीचीच सत्ता स्थापन करावी आणी आर्णीच्या विकासात भर टाकावी. आर्णी च्या मतदारांनी महायुतीला बहुमत दिले आहे ज्याचा सन्मान करणे महायुती च्या घटक पक्षांची जबाबदारी आहे. समोरील वाटाघाटीचा विषय संख्याबळानुसार घ्यावा अश्या सूचना पक्षाचे राज्यमंत्री व जिल्ह्याचे नेते इंद्रनील नाईक यांनी पक्षाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कामारकर पाटील व जिल्हा सरचिटणीस सुरेश मोर्लेवार यांच्या उपस्थितीत तालुकाध्यक्ष सुनिल पोतगंटवार यांना दिला आहे.

# पैनगंगा अभयारण्य विकासाच्या प्रतीक्षेत

•युवाराष्ट्र दर्शनढाणकी (प्रतिनिधी): शेख इरफान

उमरखेड तालुक्यातील निसर्गसंपदेने नटलेले पैनगंगा अभयारण्य आजही शासनाच्या आणि लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे विकासापासून वंचित आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होऊन ७५ वर्षे उलटली, तरी या परिसरातील पायाभूत सुविधांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. रस्ते, रोजगार आणि सुरक्षितता या आघाड्यांवर येथील नागरिकांना आजही संघर्ष करावा लागत आहे.

अभयारण्यातील अंतर्गत रस्त्यांवर जागोजागी खड्डे पडले आहेत. विशेष म्हणजे, काही ठिकाणी नवीन रस्ते करण्यात आले, मात्र ते इतक्या थातूरमातूर पद्धतीने केले गेले की पहिल्याच




पावसात पुन्हा खड्डे पडले आहेत. यामुळे पर्यटकांना आणि स्थानिक आदिवासींना जीवघेणा प्रवास करावा लागत आहे.

सन १९९० च्या दशकात या भागात नक्षलवादी विजयकुमार याला ठार करण्यात आले होते आणि अनेक नक्षलवाद्यांना अटकही झाली होती. तरीही, या भागाला नक्षलग्रस्त घोषित करून शासकीय कर्मचाऱ्यांना मिळणारे अतिरिक्त मानधन दिले जात नाही. परिणामी, कर्मचारी या भागात काम करण्यास टाळाटाळ करतात, ज्याचा थेट फटका स्थानिक आदिवासी समाजाच्या विकासाला बसत आहे. पैनगंगा नदीवरील सहस्त्रकुंड धबधबा हे पर्यटकांचे मुख्य आकर्षण आहे. मात्र, या परिसरात कोणतीही सुविधा नसल्याने पर्यटक नाईलाजा स्तव मराठवाड्यातील इस्लापूर मार्गे येतात आणि परततात. जर या परिसरात सोयी-सुविधा निर्माण केल्या असत्या, तर ढाणकी परिसरातील स्थानिकांना पर्यटनावर आधारित रोजगार मिळाला असता. मोठ्या उद्योगांचा अभाव असल्याने येथील तरुण रोजगारासाठी भटकत आहेत.

खरुज खुर्द ते ढाणकी या मार्गावरील पुलाचा प्रश्न अत्यंत गंभीर झाला आहे. पुलाची उंची कमी असल्याने पावसाळ्यात या पुलावर पाणी येते. २०२५ च्या पुरात पाणी वाढल्यामुळे दोन ते तीन दिवस शालेय मुलींना शाळेतच मुक्कामी राहावे लागले होते. या पुलाची उंची वाढवल्यास हा राज्यमार्ग बाराही महिने सुरळीत चालू शकेल, असे जाणकार सांगतात. या अभयारण्यात वाघ, बिबट्या, अस्वल आणि मौल्यवान औषधी व नस्पतींचे भांडार आहे. मात्र, लोकप्रतिनिधी केवळ मतदानापुरतेच या भागात दिसतात. मोरचंडी आणि परिसरातील नागरिकांनी विकासाच्या मुद्द्यावरून मतदानावर बहिष्कार टाकण्याचा पवित्रा घेतला होता, त्यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आश्वासने देऊन तो मागे घ्यायला लावला. मात्र, आजही परिस्थिती 'जैसे थे' असल्याने राजकीय नेत्यांविरुद्ध तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

# बा.बु. कला ना.भ. वाणिज्य व बा.पा. विज्ञान महाविद्यालय, सांस्कृतिक महोत्सव

•युवाराष्ट्र दर्शन, प्रतिनिधी, दिग्रस, दि. २ जानेवारी

दि. 29. 30 व 31 डिसेंबर 2025 रोजी विविध खेळ व क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.दिनांक 1 जानेवारी व 2 जानेवारी 2026 रोजी पुष्परचना स्पर्धा, रांगोळी स्पर्धा,डिश डेकोरेशन स्पर्धा, बेस्ट फॉर द बेस्ट स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले तसेच दिनांक 2 जानेवारी 2026 रोजी आनंद मेळावा, काव्यवाचन व गीत गायन स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, लोकनृत्य व समूह नृत्य स्पर्धा, संपन्न झाल्या या सांस्कृतिक महोत्सवाचे समारंभाध्यक्ष डी. व्ही . एस. पी. मंडळाचे अध्यक्ष



विजय कुमार बंग हे होते. समारंभाचे उद्घाटन डॉ. प्रदीप मेहता उपाध्यक्ष डी.व्ही.एस.पी. मंडळ यांचे शुभहस्ते संपन्न झाले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून वैजनाथ मुंडे ठाणेदार दिग्रस पोलीस स्टेशन हे होते. शाम पाटील, डॉ.अभय पाटील, रघुराजसिंह चौहाण, डॉ. भोंगाडे, निखिल पाटील, प्राचार्य डॉ. अरविंद लाडोळे, प्रा. पुंडलिक दिवे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उद्घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन प्रा. प्रीतम गावंडे यांनी केले तर आभार प्रा. कु. चव्हाण यांनी मानले. पाच दिवसाच्या या सांस्कृतिक महोत्सवांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थिनी यांनी मनमुराद आनंद लुटला, प्रत्येक स्पर्धेमध्ये हिररीने भाग घेऊन मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद लाडोळे यांचे मार्गदर्शनात कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी सांस्कृतिक महोत्सवाचे समन्वयक डॉ. बिरबाराव मस्के, प्रा.सि.टी. जोगिया प्रा. कु. अरुणा चव्हाण यांनी अथक परिश्रम घेतले.

# वणीच्या इतिहासातील २ जाने. हा काळा दिवस

## मानवी हक्क सुरक्षा परिषद तर्फे हुतात्म्यांना श्रद्धांजली

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, वणी, दि. २ जानेवारी

वणीच्या इतिहासातील २ जानेवारी १९७४ हा दिवस काळा दिवस म्हणून गणल्या जातो. कारण ह्या दिवशी वणी मध्ये महागाई चे विरोधात काढल्या गेलेल्या मोर्चावर पोलिसांनी गोळीबार केला आणि ह्यामध्ये ७ निरपराध लोकांचा बळी गेला व ते हुतात्मे झाले. त्या हुतात्म्यांना दरवर्षी श्रद्धांजली वाहण्यात येते.

मानवी हक्क सुरक्षा परिषद च्या वतीने २ जानेवारी ला लोकमान्य टिळक चौकात असलेल्या हुतात्मा स्मारक ठिकाणी पुष्पहार अर्पण करून व मौन राखून वणी येथील महागाई विरोधी आंदोलनातील



हुतात्मे ठरलेल्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

यावेळेस मानवी हक्क सुरक्षा परिषदेचे राज्याध्यक्ष राजु धावंजेवार, राज्य कार्यकारिणी सदस्य परशुराम पोटे, संदिप बेसरकर , सुरेश बन्सोड, विष्णू दानव, अन्य गणमान्य उपस्थित होते.

# पुसद येथे भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त प्रबोधन पर कार्यक्रम



•युवाराष्ट्र दर्शनप्रतिनिधी, पुसद, दि. २ जानेवारी

भिम टायगर सेना शाखा पुसद यांच्या वतीने एक जानेवारी रोजी भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त सकाळी 11 वाजता तीन पुतळ्यापासून भव्यदिवे रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये नृत्य बंजारा नृत्य लेझीम पथक भीमा कोरेगाव विजयस्तंभ आधी विविध देखाव्याने पुसदकरांचे लक्ष वेधले होते.

सायंकाळी पाच वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा स्मारक येथे भीम शाहीर सुरज अतीक यांचा ऐतिहासिक प्रबोधनात्मक बुद्ध भीम गीताचा बहारदार कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने भीमसैनिक उपस्थित होते

या कार्यक्रमाचे अध्यक्ष व उद्घाटक भीम टायगर सेनेचे संस्थापक अध्यक्ष दादासाहेब शेळके यवतमाळ जिल्हा अध्यक्ष किशोरदादा कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून, बुद्धरत्न भालेराव, शितल कुमार वानखेडे, प्रबोधनकार पंकज पाल महाराज, एड, विश्वास भवरे, गजानन जाधव, भोलानाथ कांबळे, राजेश ढोले समाधान केवटे, मारोती भस्मे. शाकिब शहा, विष्णू सरकटे लपू कांबळे जगदीश सावळे महेंद्र कांबळे गीता ताई कांबळे, विष्णू सरकटे, प्रवीण राजहंस, इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णा कृती पुतळ्याला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुलाबी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

# महासंघ व सखी समर्पण यांच्या संयुक्त विद्यमाने स्नेहमीलन सोहळा व नवनिर्वाचित अध्यक्षांसह नगरसेवकांचा सत्कार

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २ जानेवारी

नववर्षाच्या मंगलमय शुभारंभानिमित्त भारतीय स्वयंसेवी संस्था महासंघ (भारत) व सखी समर्पण, यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्नेहमीलन सोहळा व नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार समारंभ उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला. हा कार्यक्रम यवतमाळ येथील महासंघाच्या कार्यालयात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय स्वयंसेवी संस्था महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. संजय कांबळे हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून महासंघाचे



अमरावती विभागीय अध्यक्ष विजय कुमार बुंदेला उपस्थित होते. प्रास्ताविकात जिल्हाध्यक्ष डॉ. दिपक घरझोडे यांनी महासंघाच्या माध्यमातून यवतमाळ जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती देत पदाधिकाऱ्यांच्या कार्याचा गौरव केला. यावेळी विभागीय अध्यक्ष विजय कुमार बुंदेला यांनी समाजकार्याची आजची गरज, स्वयंसेवी संस्थांची समाजातील भूमिका व संघटित प्रयत्नांतून होणाऱ्या सकारात्मक बदलांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमात नवनिर्वाचित नगराध्यक्ष कु. प्रियदर्शनी उईके यांच्यासह नवनिर्वाचित नगरसेवक बिपीन चौधरी, डॉ. नीरज वाघमारे, भारत ब्राह्मणकर, आकाश पर्तेकी व विपुल खोब्रागडे यांचा शाल, पुष्पगुच्छ व ग्रामगीता देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. यानंतर नगराध्यक्ष कु. प्रियदर्शनी उईके व राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. संजय कांबळे यांच्या हस्ते महासंघाच्या नवनिर्वाचित विभागीय व जिल्हा स्तरावरील पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष व नगरसेवकांनी महासंघाच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत भविष्यात सहकार्य करण्याची भावना व्यक्त केली.

अध्यक्षीय भाषणात डॉ. संजय कांबळे यांनी महासंघाच्या ध्येय-धोरणांची माहिती देत महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या "समृद्ध महिला प्रकल्प" या उपक्रमावर सविस्तर प्रकाश टाकला. महिलांचे आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक सबलीकरण हे महासंघाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हाध्यक्ष डॉ. दिपक घरझोडे, उपाध्यक्ष किशोर बाभुळकर, प्रतीक तराळकर तसेच सखी समर्पण, यवतमाळ चे मार्गदर्शक ॲड. पंकज ओसवाल, संयोजिका दुर्गा मिश्रा, नवनियुक्त अध्यक्ष डॉ. कल्पना कुलरे यांच्यासह सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विजय कुमार बुंदेला यांनी केले.

कार्यक्रमानंतर विविध मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले असून स्नेहभोजनाने स्नेहमीलन सोहळ्याची सांगता झाली. या कार्यक्रमामुळे नववर्षाच्या प्रारंभी सामाजिक ऐक्य, सहकार्य व सकारात्मक ऊर्जेचा संदेश मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

**CHANGE OF NAME**

I MOHAMMAD ISMAIL S/O MOHAMMAD SULAIMAN MAWAL HAVE CHANGED MY NAME FROM **MOHAMMAD ISMAIL MOHAMMAD SULAIMAN MOWAL TO MOHAMMAD ISMAIL MOHAMMAD SULAIMAN MAWAL** FOR ALL FUTURE PURPOSES.
Name & Add:- Mohammad Ismail Mawal, Yavatmal. 9822836888

**CHANGE OF NAME**

I MUMTAJ W/O MOHAMMAD ISMAIL MAWAL HAVE CHANGED MY NAME FROM **MUMTAJ MOHAMMAD ISMAIL TO MUMTAJ MOHAMMAD ISMAIL MAWAL** FOR ALL FUTURE PURPOSES.
Name & Add:- Mumtaj Mawal, Yavatmal. 9822836888

**CHANGE OF NAME**

OLD NAME :- ASIFKHAN SAHIBKHAN PATHAN
NEW NAME :-ASIF KHAN SAHEB KHAN PATHAN

**CHANGE OF NAME**

OLD NAME :- PATHAN PARZANA SAHIBKHAN
NEW NAME :-FARZANA SAHEB KHAN PATHAN

**CHANGE OF NAME**

OLD NAME :- PATHAN SAHIBKHAN FAQIRKHAN
NEW NAME :- SAHEB KHAN FAKEER KHAN PATHAN

